महाराष्ट्र शासन

**महत्वाचे**

दू.क्र.०२२-२२७९३१५२

ई-मेल :-murlidhar.munde@nic.in

क्र.न्यायाप्र १२१४/प्र.क्र. २३६ /२०१४/स्वासैक १

सामान्य प्रशासन विभाग,
नवीन प्रशासन भवन, १९ वा मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०९ /०६/२०१६.

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र शासन.

**विषय :-** स्वातंत्र्य सैनिकाच्या पाल्यास अनुज्ञेय असलेल्या सवलतींबाबतची माहिती वेबसाईट वर प्रसिध्द करण्याविषयी...

**संदर्भ:-** मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी याचिका क्र.४२१२/२००८ व याचिका क्र.२७९/२०१३ मध्ये दिलेला आदेश.

महोदय,

विषयांकित प्रकरणी संदर्भीय न्यायनिर्णयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, **स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्यांना शासकीय सेवेत गट 'क' व 'ड' मध्ये नियुक्ती करण्यासाठी "पसंतीक्रम" आहे, आरक्षण नाही.** स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्यांच्या संदर्भात शासकीय सेवेत प्रवेशाकरिता सामान्य प्रशासन विभाग, कार्या.१६-अ ने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/शासन परिपत्रकांची माहिती सोबतच्या विवरणपत्रात नमूद केली आहे. आपणांस विनंती की, सदर विवरणपत्रातील माहिती व त्याखाली आपल्या जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांनी केलेल्या नामनिर्देशित पाल्यांची यादी आपल्या कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी, जेणेकरुन संबंधितास उचित माहिती ज्ञात होईल व अनावश्यक न्यायालयीन प्रकरणांच्या संख्येत वाढ होणार नाही.

आपला,

( सु.ना. रणखांबे )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत: वरीलप्रमाणे

प्रत, निवडनस्ती ( स्वासैक १ )

WP 279..2013- shrimati. latika anantrao joshi-usmanabad

**स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या गट 'क' आणि गट 'ड' च्या पद भरती मध्ये सवलतीं देण्याविषयी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाची माहिती व सध्या अनुज्ञेय असलेल्या सवलतीची माहिती**

| अ. क्र. | शासन निर्णय क्रमांक व दिनांक | विषय |
|---|---|---|
| १ | शासन परिपत्रक ज्ञापन, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीएनएस-१०६५/४६५२/जे, दिनांक १२.१०.१९६५ | Employment of freedom fighters in Government service |
| २ | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीएनएस१०७५/३८१/४७५/१६-अ, दिनांक ६.९.१९७६ | Benefits of employment of freedom fighters in Government service |
| ३ | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीएनएस १०८१/१/१६-अ, दिनांक २.३.१९८१ | Employment of freedom fighters in Government service |
| ४ | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीएनएस१०८०/१७३२/१६-अ, दिनांक ३०.६.१९८२ | राष्ट्रीय चळवळीत काम केलेल्या शासकीय कर्मचा-यांना जादा अर्हता सेवा मंजूर करणेबाबत |
| ५ | शासन परिपत्रक क्र. सी एन एस-१०८४/सी आर-१०३/ १६ -अ दि.१०.०१.१९८५ | स्वातंत्र्य सैनिकांना शासकिय सेवेत वर्ग-३ आणि वर्ग-४ मधील पदांवर सेवाप्रवेशासाठी सवलत मिळण्याबाबत. |
| ६ | शासन निर्णय क्र. सी एन एस-१०८२/३६९९/सी आर-२८/८५/१६-अ दि.२२.११.१९८५ | स्वातंत्र्य सैनिकांना शासकिय सेवेत वर्ग-३ आणि वर्ग-४ मधील पदांवर सेवाप्रवेशासाठी सवलत स्वातंत्र्य सैनिकाची नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींच्या नावांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये ठेवण्याबाबत. |
| ७ | शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीएनएस-१०८७/०/सीआर१४/१६-अ, दिनांक १३.३.१९८७ | स्वातंत्र्य सैनिक/भूमिगत स्वातंत्र्य सैनिक/आझाद हिंद (स्वातंत्र्य) सैनिक यांचे नामनिर्देशितास शासकीय सेवेत वर्ग ३ व वर्ग ४ च्या पदावर नोकरी मिळणेबाबत |
| ८ | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीएनएस-१०८७/२७४३/सीआर-४१/१६-अ, दिनांक १२.२.१९८८ | स्वातंत्र्य सैनिकांना शासकीय सेवेत वर्ग-३ आणि वर्ग-४ मधील पदांवर सेवाप्रवेशासाठी सवलत मिळणेबाबत |
| ९ | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीएनएस-१०८७/३४६२/सीआर-५५/८८/१६-अ, दिनांक ३०.११.१९८८ | शासकीय सेवेतील नेमणुकीबाबतच्या सवलतीसाठी स्वातंत्र्य सैनिकाने करावयाच्या नामनिर्देशन पत्राबाबत |
| १० | शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रनिमं-२४८९/प्र.क्र.२२३/८९/१३-अ, दिनांक २०.२.१९९० | महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ व प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळे- सुधारणा करण्याबाबत |
| ११ | सी एन एस-१०८९/३१८६/३९६९ सी आर-१७/९०/१६-अ दि. १७.०३.१९९० (शासन पत्र) | स्वातंत्र्य सैनिकाने एकदा दिलेले नामनिर्देशन बदलण्याबाबत |
| १२ | शासन निर्णय क्रमांक सी एन एस-१०९०/३४९७ सी आर-७४/९०/१६-अ दि. २२.०१.१९९१ | स्वातंत्र्य सैनिक/ त्यांचे नामनिर्देशित यांना शासकिय सेवेत वर्ग-३ आणि वर्ग-४ मधील पदांवर नेमणुकीसाठी वयोमर्यादेत सवलत. |
| १३ | शासन निर्णय क्रमांक सी एन एस-१०८९/३४९७ सी आर-७४/९०/१६-अ दि. २२.०१.१९९१ | स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे नामनिर्देशित यांना शासन सेवेत नेमणुकासाठी दिलेल्या सवलतीनुसार नेमणुका देण्याबाबत कार्यवाही तत्परतेने करण्यासंबंधात. |
| १४ | शासन परिपत्रक क्र. सी एन एस-१०८७/४९९/के.नं.१२/१६-अ स्वासैक १, दि.४.०३.१९९१. | स्वातंत्र्य सैनिक/ त्यांचे नामनिर्देशित यांना शासकिय सेवेत वर्ग-३ आणि वर्ग-४ मधील पदांवर नोकरी देण्याबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे एकत्रिकरण . |

| अ. क्र. | शासन निर्णय क्रमांक व दिनांक | विषय |
|---|---|---|
| १५ | शासन परिपत्रक क्र. सी एन एस-१०९२/३६४७/प्र.क्र.७७/१६-अ स्वासैक १, दि.१८.०१.१९९३ | स्वातंत्र्य सैनिक/ त्यांचे नामनिर्देशित व्यक्ती यांना शासकिय सेवेत नेमणुकीसाठी दिलेलया सवलतीनुसार नेमणुका देण्याबाबत कार्यवाही तत्परतेने करण्यासंबंधात. |
| १६ | शासन निर्णय क्रमांक सी एन एस-१०९७/५६७ सी आर-४०/९७/१६-अ दि. २४.०६.१९९७ | शासकिय सेवेतील नेमणुकी बाबतच्या सवलतीसाठी स्वातंत्र्य सैनिकांची केलेल्या नामनिर्देशन पत्राची तपासणीसाठी/ पडताळणीसाठी यंत्रना निर्माण करण्याबाबत. |
| १७ | शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१००३/प्र.क्र.९६/२००३/१३-अ, दिनांक १९.११.२००३ | सेवाभरती रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत (सेवायोजन कार्यालये) व प्रसार माध्यमातून प्रसिध्दि देऊन करण्याबाबत.. |
| १८ | शासन निर्णय क्रमांक सी एन एस-१००४/८०२/ प्र.क्र. ४२/०४/१६-अ दि. ६.०८.२००४. | स्वातंत्र्य सैनिक नातवाचे / नातीचे नामनिर्देशन करण्याबाबत. |
| १९ | शासन परिपत्रक क्र. न्याप्र.-१००३/९९/प्र.क्र.२/०३/(भाग-२)/ १६-अ दि.२५ ऑक्टोबर,२००५. | शासकिय सेवेत वर्ग-३ आणि वर्ग-४ भरतीची एकत्रित मार्गदर्शक तत्वे. |
| २० | शासन निर्णय क्रमांक सी एन एस-१०१०/१५०/प्र.क्र./१०/१६-अ दि. २९.५.२०१० | स्वातंत्र्य सैनिक/ त्यांचे नामनिर्देशन यांना शासकिय सेवेत वर्ग-३ आणि वर्ग-४ मधील पदावर सेवाप्रवेशासाठी सवलत. स्वातंत्र्य सैनिकाने केलेले नामनिर्देशन बदलण्याचे अधिकार त्यांच्या विधवा वारस पत्नीस देणेबाबत. |
| २१ | शासन निर्णय क्रमांक निवक/ १०१० / प्रक्र.०८ /२०१० /१६-अ दि. ६.१०.२०१० | स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य, जनगनना कर्मचारी, निवडणुक कर्मचारी इत्यादी विविध घटकांना वयोमर्यदेत सवलत व टंकलेखणाची परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत. |
| २२ | शासन निर्णय, क्रमांकः स्वासैक-१४१३ /प्र.क्र.२२८/१६-अ दिनांक २८.०२.२०१४ | स्वातंत्र्य सैनिकांना त्यांच्या वारस विधवा पत्नी वा विधुर पती यांनी केलेले मनिर्देशिन त्यांच्या मृत्यूनंतर रद्द करण्याबाबत. |
| २३ | शासन निर्णय क्र. संकीर्ण-१११४/प्र.क्र.२००/१६-अ, दिनांक ४.९.२०१५ | प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य इत्यादी घटकातील उमेदवारांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन संधी तसेच दोन वर्षे इतकी मुदत वाढ देण्याबाबत. |

सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक,क्र. संकीर्ण-१००३/प्र.क्र.९६/२००३/१३-अ, दिनांक १९.११.२००३ नुसार खालील प्रमाणे आदेश देण्यात आलेले आहेत:-

**"शासकीय/निमशासकीय कार्यालये, महामंडळे, सहकारी संस्था, स्वायत्त संस्था, सार्वजनिक उपक्रम इत्यादींच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांमधील रिक्त पदे भरताना (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येणारी पदे वगळून) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून (सेवायोजन कार्यालये) ज्येष्ठतेनुसार यादी प्राप्त करुन घेण्यात यावी, त्याचबरोबर रिक्त पदांबाबतची जाहिरात सर्व प्रसार माध्यमांतून (वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे दूरदर्शन, रेडियो, नोटीस बोर्ड, इत्यादी) प्रसिध्दी देऊन अर्ज मागविण्यात यावेत व वरील दोन्ही प्रकारे होणा-या याद्यांमधून/ अर्जांमधून पात्र उमेदवारांची विहित पध्दतीनुसार निवड करण्यात यावी"**

स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्याने शासकीय सेवेतील रिक्त पद भरतीबाबत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द झाल्यावर सदर जाहिरातीस अनुसरुन संबंधित नियुक्ती अधिका-याकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे व निवड प्रक्रियेतून नोकरी मिळविण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्यांना शासकीय सेवेत गट 'क' व 'ड' मध्ये नियुक्ती करण्यासाठी "पसंतीक्रम" आहे, आरक्षण नाही.** गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची निवड करताना एकाच क्रमांकावर अनेक उमेदवार असतील, अशावेळी नियुक्ती अधिका-याने उमेदवाराची निवड पसंतीक्रमाच्या प्राथम्यानुसार करावयाची आहे. (शासन परिपत्रक, क्र. न्यायप्र १००३/९९/प्र.क्र.४२/०४/१६-अ, दिनांक २५.०५.२००५ मधील परि.४ व परि.७)

*********************